Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P034
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# कैद्यांच्या सुधारणा संदर्भातील सम्राट अशोकांचे धोरण

**श्री लक्ष्मण नबाजी साळवे,** संशोधक विद्यार्थी,
समाजशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

**सारांश** : प्राचीन भारतातील मौर्य साम्राज्याचा महान राजा सम्राट अशोक याने कैद्यांशी कसे वागावे याबाबत खूप चांगले आणि माणुसकीचे धोरण स्वीकारले होते. कलिंग युद्धानंतर त्यांच्या मध्ये परिवर्तन होऊन त्यांना हिंसा व कठोर शिक्षा चुकीच्या वाटू लागल्या. त्यामुळे त्यांनी शिक्षा देण्यापेक्षा लोकांना सुधारण्यावर जास्तीत जास्त भर दिला. सम्राट अशोकांनी कैद्यांवर कठोर शिक्षा करण्याऐवजी दया, करुणा आणि सुधारणा या नीती मूल्यांवर आधारित कारागृह सुधार व्यवस्था तयार केली. त्यांनी 'धम्म' या विचारधारेद्वारे कैद्यांना चांगले वागायला, स्वतःवर नियंत्रण ठेवायला आणि समाजासाठी उपयुक्त नागरिक बनायला शिकवले. सम्राट अशोकांच्या शिलालेखांमध्ये कैद्यांना माणूस म्हणून वागवावे, त्यांना अनावश्यक छळ करू नये, तसेच काही वेळा शिक्षा कमी करावी किंवा माफ करावी, असे आदेश दिलेले दिसतात. न्याय देताना प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता ठेवण्यावरही त्यांनी भर दिला. म्हणूनच असे म्हणता येते की सम्राट अशोकांचे कैद्यांच्या सुधारण्याचे धोरण हे आजच्या मानवाधिकार आणि सुधारात्मक न्याय या कल्पनांसारखेच होते. त्यामुळे त्यांचे धोरण फक्त इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या काळातही प्रेरणा देणारे आहे.

**बीजशब्द** : सम्राट अशोक, कैदी सुधारणा, धम्म धोरण, मानवतावादी न्याय, सुधारात्मक न्यायव्यवस्था, कारागृह सुधारणा

**प्रस्तावना** : प्राचीन भारतातील मौर्य साम्राज्याचा महान राजा सम्राट अशोक हा केवळ एक शक्तिशाली शासक नव्हता, तर तो माणुसकी, दया आणि न्याय यांना महत्त्व देणारा राजा होता. कलिंग युद्धानंतर झालेल्या भीषण हिंसेमुळे अशोकाचे मन बदलले. त्यानंतर त्याने बौद्ध धम्म स्वीकारला आणि अहिंसा, करुणा व मानवतावाद या मूल्यांवर आधारित राज्यकारभार सुरू केला. अशोकाने न्यायव्यवस्थेत मोठ्या सुधारणा केल्या. त्याला असे वाटत होते की गुन्हा करणाऱ्यालाही माणूस म्हणून वागवले पाहिजे आणि शिक्षेचा उद्देश सूड नसून सुधारणा व पुनर्वसन असावा. त्यामुळे त्याने कैद्यांना अन्यायकारक शिक्षा देऊ नये, निर्दोष व्यक्तींना सोडून द्यावे आणि कठोर शिक्षेपूर्वी विचार करण्याची संधी द्यावी, असे आदेश दिले.

अशोकांच्या शिलालेखांमधून (दगडांवर कोरलेले आदेश) आपल्याला त्याच्या न्यायविषयक विचारांची माहिती मिळते. चौथा स्तंभलेख, पाचवा शिलालेख तसेच धौली व जौगड येथील शिलालेखांमध्ये कैद्यांशी न्यायाने वागण्याचे, शिक्षा देताना समतोल ठेवण्याचे आणि दयाळू दृष्टिकोन ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत. मृत्युदंड देण्यापूर्वी तीन दिवसांची मुदत देण्याची तरतूद ही त्या काळातील अतिशय प्रगत कल्पना होती.

इतिहासकार, संशोधक आणि आधुनिक न्यायव्यवस्थेचे अभ्यासक मानतात की सम्राट अशोकांचे हे धोरण आजच्या मानवाधिकार, तुरुंग सुधारणा आणि सुधारात्मक न्यायव्यवस्था यांसारख्या संकल्पनांशी खूप मिळतेजुळते आहे. त्यामुळे सम्राट अशोकांना आधुनिक न्यायविचारांचे प्रारंभिक प्रवर्तक मानले जाते.

म्हणूनच, सम्राट अशोकांचे कैद्यांच्या सुधारणा संदर्भातील धोरण हे केवळ इतिहासाचा भाग नसून, आजच्या समाजासाठीही मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. सम्राट अशोकांच्या कैद्यांसंबंधी धोरणांचा ऐतिहासिक, तात्त्विक व नैतिक अभ्यास करणे.
२. कैदी सुधारणा, पुनर्वसन व मानवाधिकार याबाबत अशोकांच्या विचारांचे योगदान मांडणे.
३. समकालीन कारागृह सुधारणांसाठी अशोकांचे धोरण मार्गदर्शक ठरू शकते का हे तपासणे.

**संशोधन पद्धती :**

संशोधन प्रकार : ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धत : गुणात्मक संदर्भ स्रोत प्राथमिक स्रोत : अशोकाचे शिलालेख दुय्यम स्रोत : इतिहासग्रंथ, संशोधन लेख, जर्नल्स, विश्लेषण साधन विषयवस्तू विश्लेषण

**१. कलिंग युद्धः एक हृदयपरिवर्तन**

कलिंग युद्धानंतर (इ.स.पू. २६१) अशोकाने बौद्ध धम्माचा स्वीकार केला. सम्राट अशोकांच्या जीवनातील सर्वात मोठे वळण म्हणजे 'कलिंगचे युद्ध'. या युद्धात झालेला प्रचंड रक्तपात, लाखो लोकांचा मृत्यू आणि निराधार झालेली मुले-स्त्रिया पाहून अशोकांचे मन विषण्ण झाले. विजयाचा आनंद साजरा करण्याऐवजी त्यांना पश्चात्ताप झाला.

भेरीघोषा म्हणजे प्राचीन काळातील युद्धाची घोषणा करणारा नगाऱ्यांचा आवाज, जो सम्राट अशोकांच्या धम्म नीतीपूर्वीच्या साम्राज्यविस्ताराच्या धोरणाचे प्रतीक होता. कलिंग युद्धापूर्वी (इ.स.पू. २६१) अशोकाने भेरीघोषेच्या माध्यमातून हिंसक विजय आणि सैन्यशक्तीवर भर दिला होता, परंतु युद्धातील रक्तपाताने त्यांचे हृदय परिवर्तन झाले आणि त्यांनी धम्मघोषा (धर्माचा आवाज) स्वीकारला. येथूनच त्यांच्या 'भेरीघोषा'चे (युद्धाचा आवाज) रूपांतर 'धम्मघोषात' (शांतीचा आवाज) झाले. त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला आणि ठरवले की आता सत्ता तलवारीने नाही, तर प्रेमाने आणि न्यायाने चालवायची.

**२. अशोकाचा 'धम्म' आणि न्यायविचार**

अशोकाचा धम्म हा केवळ धर्म नव्हता, तर ती एक 'जीवन जगण्याची पद्धत' होती. यामध्ये अहिंसा, सत्य, दया आणि दान याला महत्त्व होते. अशोकाचा असा विश्वास होता की, राजा हा प्रजेचा पिता असतो. ज्याप्रमाणे पिता आपल्या मुलांच्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करतो, त्याचप्रमाणे राजाने गुन्हेगारांना केवळ शिक्षा न देता त्यांना सुधारण्याची संधी दिली पाहिजे.

**३. कैद्यांच्या सुधारणेबाबतची ऐतिहासिक धोरणे**

अशोकाने त्या काळात अशा काही सुधारणा केल्या ज्या आजही आधुनिक मानवाधिकार आयोगाच्या नियमावलीत दिसतात:

**३.१ मृत्युदंडापूर्वी तीन दिवसांची मुदत:** अशोकाच्या चौथ्या स्तंभलेखात उल्लेख आहे की, ज्या कैद्यांना फाशीची किंवा मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे, त्यांना शिक्षेपूर्वी ३ दिवसांची मुदत दिली जावी. या काळात कैदी आपल्या गुन्ह्याचा पश्चात्ताप करू शकत असे किंवा त्याचे नातेवाईक त्याच्या बचावासाठी पुन्हा विनंती करू शकत असत. ही 'रिव्ह्यू पिटीशन' (पुनर्विचार याचिका) या आधुनिक संकल्पनेची सुरुवात होती. त्यांना शिक्षेची अंमलबजावणी करण्यापूर्वी ३ दिवसांची मुदत दिली जात असे. या ३ दिवसांचा उद्देश असा होता की : कैद्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप करण्यासाठी वेळ मिळावा. त्याचे नातेवाईक त्याच्या बचावासाठी किंवा शिक्षा कमी करण्यासाठी अधिकाऱ्यांकडे पुन्हा दाद मागू शकतील.कैदी दानासारखी पुण्यकर्मे करून आपली मानसिक शांती मिळवू शकेल.

**३.२ न्यायदानात समानता:** अशोकाने 'दंडसमता' आणि 'व्यवहारसमता' लागू केली. याचा अर्थ असा की, गुन्हा करणारी व्यक्ती श्रीमंत असो वा गरीब, सर्वांना सारखाच न्याय मिळावा.

**३.३ कैद्यांची मुक्तता:** सम्राट अशोकाने आपल्या राज्याभिषेकाच्या दिवशी किंवा विशिष्ट महत्त्वाच्या प्रसंगी वृद्ध, आजारी किंवा ज्यांच्या कुटुंबात कोणीही कमावणारे नाही, अशा कैद्यांना मुक्त करण्याचे आदेश दिले होते.

**३.४ परिचारिकेचे रूपक:** अशोकाने येथे एक प्रसिद्ध उदाहरण दिले आहे. तो म्हणतो की, ज्याप्रमाणे एक पालक आपल्या मुलाला एका 'कुशल परिचारिके'कडे सोपवतो आणि ती परिचारिका मुलाची चांगली काळजी घेईल असा विश्वास ठेवतो, तसेच मी माझी प्रजा 'राज्जुकां'च्या स्वाधीन केली आहे.

**४. शिलालेखांमधील पुरावे**


शिला लेखाची भाषा व लिपी: प्राकृत भाषा आणि ब्राह्मी लिपी. विशेष म्हणजे ते दगडांवर कोरलेले होते जेणेकरून येणाऱ्या पिढ्यांना ते मार्गदर्शक ठरतील.

**४.१ चौथा स्तंभलेख आणि चौथा मुख्य शिलालेख**

स्तंभलेख ४: न्यायव्यवस्था आणि राज्जूक अधिकाऱ्यांशी संबंधित आहे. यामध्ये

यात प्रादेशिक अधिकाऱ्यांना (राज्जुकांना) कैद्यांशी दयाळूपणे वागण्याचे आदेश दिले आहेत. तसेच चौथा मुख्य शिलालेख ४: 'भेरीघोष' (युद्धाचा आवाज) थांबवून 'धम्मघोष' (धर्माचा आवाज) सुरू करण्यावर आणि अहिंसेवर भर देतो.


e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV




**४.२ धौली आणि जौगढ़ शिलालेख** : ओडिशा राज्यातील **जौगढ़**, गंजम जिल्ह्यात, ब्रह्मपुर शहराजवळ.यां शिलालेखाचा काळ (इ.स.पू. ३ रे शतक). **ऐतिहासिक महत्व:** कलिंग युद्धानंतर अशोकांच्या पश्चात्ताप व धम्मनीतीचे प्रतिबिंब दर्शविणारा प्रमुख शिलालेख. **या शिलालेखाचे वैशिष्ट्य:** येथे अशोकांच्या प्रमुख शिलालेखांची प्रत आढळते; ११, १२ व १३ क्रमांकांच्या ऐवजी **कलिंगसाठी खास दोन लेख** कोरलेले आहेत जौगढ़ शिलालेख हा कलिंग प्रदेशातील न्याय, करुणा व प्रशासन सुधारणा यांवर आधारित अशोकांच्या धम्मनीतीचा महत्त्वाचा पुरावा आहे. येथे अशोकाने स्पष्टपणे सांगितले आहे की, "विनाकारण कोणालाही तुरुंगात टाकू नका आणि कोणालाही छळू नका."

**४.३ पाचवा शिलालेख:** यात कैद्यांच्या कुटुंबाची काळजी घेण्याबाबत आणि त्यांच्या आर्थिक मदतीबाबत भाष्य केले गेले आहे.

**पाचवा शिलालेख**




**पाचवा शिलालेख:** 'धम्म महामात्रांची' नियुक्ती आणि सामाजिक न्याय

हा शिलालेख अशोकाच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. राज्याभिषेकानंतर १३ वर्षांनी सम्राट अशोकाने हा शिलालेख कोरवून घेतला होता.

**४. ३.१ धम्म महामात्रांची नियुक्ती:** अशोकाने 'धम्म महामात्र' नावाच्या विशेष अधिकाऱ्यांची नेमणूक केली. यांचे काम केवळ धर्मप्रसार करणे नव्हते, तर समाजात न्याय प्रस्थापित करणे हे होते. तसेच त्यांचे आणखीन एक मुख्य काम म्हणजे तुरुंगांना भेटी देणे.त्यामध्ये ते खालील गोष्टींची खात्री करत असत :

कोणावरही अन्याय तर होत नाही ना?,कैद्यांना तुरुंगात किमान मानवी सुविधा मिळत आहेत का?, ज्यांना पैशांच्या अभावी दंड भरता येत नाही, त्यांना मदत करणे.

**४. ३.२ कैद्यांसाठी विशेष तरतूद:** या शिलालेखात अशोकाने स्पष्टपणे सांगितले आहे की, धम्म महामात्रांनी तुरुंगात जाऊन कैद्यांची स्थिती तपासावी. जे कैदी वृद्ध आहेत, ज्यांना मुलेबाळे आहेत किंवा ज्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी आहे, अशांची शिक्षा कमी करावी किंवा त्यांना मुक्त करावे.


**४. ३.३ सर्वधर्मीय कल्याण:** हे अधिकारी केवळ एका धर्मासाठी काम करत नव्हते, तर हिंदू, जैन, बौद्ध अशा सर्वच धर्मांतील लोकांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्यामधील वाद मिटवण्यासाठी काम करत असत.

**५. सातवा शिलालेख: धार्मिक सहिष्णुता (सर्व पंथांचा आदर)**

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P034
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

आजच्या काळात आपण ज्याला 'धर्मनिरपेक्षता' म्हणतो, त्याचे मूळ आपल्याला अशोकाच्या सातव्या शिलालेखात आढळते.

**सातवा शिलालेख**



**५.१ एकत्र निवास:** अशोकाने या शिलालेखात संदेश दिला आहे की, "सर्व संप्रदायांच्या (धर्मांच्या) लोकांनी सर्व ठिकाणी एकत्र राहावे." त्याला असे वाटत होते की, मनुष्य हा कोणत्याही धर्माचा असला तरी त्याने स्वतःवर तसेच मनावर संयम ठेवावा आणि आपल्या मनाची शुद्धता राखावी.
**५.२ सहिष्णुतेचा संदेश:** अशोकाचे मत होते की, प्रत्येक धर्मात काही ना काही चांगले असते. त्यामुळे दुसऱ्याच्या धर्माचा द्वेष न करता त्यातील चांगुलपणा स्वीकारावा. असे मार्गदर्शक सूचक आपल्याला त्यामधून दिसून येते.
**५.३ मनाची शुद्धता आणि कृतज्ञता:** यात अशोकाने म्हटले आहे की, जर एखाद्या व्यक्तीने खूप दान दिले पण त्याच्याकडे 'संयम' आणि 'भावशुद्धी' नसेल, तर ते दान व्यर्थ आहे

**तक्ता क्रमांक १.**

| **वैशिष्ट्ये** | चौथा स्तंभ लेख न्यायव्यवस्था | पाचवा शिलालेख (न्याय आणि मदत) | सातवा शिलालेख (सहिष्णुता आणि एकता) |
|---|---|---|---|
| **मुख्य उद्देश** | कैद्यांशी दयाळूपणे वागण्याचे आदेश | गरीब, वृद्ध आणि कैद्यांना मदत करणे. | सर्व धर्मांच्या लोकांमध्ये प्रेम निर्माण करणे. |
| **अधिकारी** | प्रादेशिक अधिकाऱ्यांची नियुक्ती (राज्जुकांना) | 'धम्म महामात्र' या पदाची निर्मिती. | वैयक्तिक चारित्र्य आणि संयमावर भर. |
| **आजचे साम्य** | दयाळूपणा | आधुनिक 'तुरुंग सुधारणा' आणि 'समाज कल्याण विभाग'. | भारताच्या संविधानातील 'धर्मनिरपेक्षता' आणि 'लोकशाही'. |

## ६ . सुधारात्मक न्यायव्यवस्था

आजच्या काळात आपण म्हणतो की, "गुन्ह्याचा तिरस्कार करा, गुन्हेगाराचा नाही." ही संकल्पना अडीच हजार वर्षांपूर्वी अशोकाने मांडली होती. अशोकाच्या मते, शिक्षेचा उद्देश 'सूड' घेणे हा नसून 'सुधारणा' करणे हा असावा. कैद्याला समाजात पुन्हा सन्मानाने जगता यावे, यासाठी त्याला मानसिक आणि आध्यात्मिक मार्गदर्शन दिले जावे, असा त्यांचा आग्रह होता.

## ७. आधुनिक मानवाधिकारांशी तुलना

आजच्या संयुक्त राष्ट्रसंघाने (UNO) ठरवलेले मानवाधिकार आणि अशोकाची धोरणे यात कमालीचे साम्य आहे.

**७.१ मानवी वागणूक:** कैद्यांनाही माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे, हे अशोकाने ओळखले होते.

**७.२ न्यायप्रक्रियेतील पारदर्शकता:** शिक्षेत भेदभाव नसावा, हा अशोकाचा नियम आजच्या संविधानाचा पाया आहे.

### ७.३ वर्तमानातील प्रेरणा

सम्राट अशोक आपल्याला शिकवतात की, शक्तीपेक्षा 'करुणा' मोठी असते. एखादी व्यक्ती चुकली तर तिला कायमचे संपवण्यापेक्षा तिला सुधारण्याची संधी देणे हेच श्रेष्ठ राजाचे लक्षण आहे. आजच्या काळात जेव्हा आपण समाजातील गुन्हेगारीकडे पाहतो, तेव्हा अशोकाचे 'हृदयपरिवर्तनाचे' मॉडेल अधिक प्रभावी वाटते.

थोडक्यात सम्राट अशोक हे केवळ इतिहासातील एक नाव नसून ते एक महान दूरदृष्टीचे होते. हे त्यांनी दाखवून दिले की, अशोक एक शक्तिशाली सम्राट देखील दयाळू असू शकतो. त्यांचे कैदी सुधारणेचे धोरण हे

जगातील मानवाधिकारांचे पहिले पाऊल मानले जाते. म्हणूनच, सम्राट अशोकांना 'आधुनिक न्यायविचारांचे प्रारंभिक प्रवर्तक' म्हणणे सार्थ ठरते. त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे हीच खऱ्या अर्थाने आपले प्रेरणा स्थान आहे.

**८. शिक्षेचा उद्देश: सूड नाही, तर सुधारणा**

अशोकापूर्वीच्या काळात 'डोळ्याच्या बदल्यात डोळा' अशा प्रकारचा सूड घेण्याची प्रवृत्ती न्यायव्यवस्थेत होती. अशोकाने हे बदलून '**सुधारात्मक न्याय**' ही संकल्पना मांडली. त्यांच्या मते, गुन्हेगार हा देखील एक माणूस आहे आणि त्याच्याकडून झालेली चूक सुधारण्याची संधी त्याला मिळायला हवी. शिक्षेचा मुख्य उद्देश कैद्याला छळणे हा नसून त्याला समाजात सन्मानाने जगण्यायोग्य बनवणे हा होता.

**९. कायद्याचे मानकीकरण:**

अशोकाने आपल्या साम्राज्यात दोन महत्त्वाची तत्त्वे लागू केली:

**९.१ दंडसमता:** एकाच प्रकारच्या गुन्ह्यासाठी सर्वांना एकसारखीच शिक्षा असावी, मग तो श्रीमंत असो वा गरीब.

**९.२ व्यवहारसमता:** न्यायालयीन प्रक्रिया सर्वांसाठी पारदर्शक आणि समान असावी.

**१०. मानसिक आणि आध्यात्मिक सुधारणा**

अशोकाने केवळ भौतिक सोयीच दिल्या नाहीत, तर कैद्यांच्या विचारांत बदल घडवून आणण्यासाठी 'धम्म' उपदेशाची व्यवस्था केली. हिंसेचा मार्ग सोडून अहिंसेचा आणि सत्याचा मार्ग स्वीकारण्यासाठी कैद्यांचे प्रबोधन केले जाई. यामुळे गुन्हेगार पुन्हा गुन्हेगारीकडे न वळता एक चांगला नागरिक म्हणून समाजात परतू शकले.

**११. आधुनिक काळाशी नाते**

आज आपण ज्याला 'मानवाधिकार' म्हणतो, त्याची बीजं अशोकाच्या या धोरणांमध्ये दिसतात. आजच्या तुरुंग सुधारणा, जिथे कैद्यांना शिक्षण आणि कौशल्ये शिकवली जातात, ही संकल्पना अशोकाच्या 'सुधारात्मक' विचारांशी मिळतीजुळती आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

हे संशोधन प्राचीन भारतीय न्यायविचार आणि आधुनिक सुधारात्मक न्यायव्यवस्था यांमधील दुवा स्पष्ट करते. तसेच कारागृह सुधारणा, कैदी पुनर्वसन व मानवाधिकार या क्षेत्रांत भारतीय तत्त्वज्ञानाचे योगदान अधोरेखित करते. धोरणनिर्माते, कारागृह प्रशासन व मानवाधिकार अभ्यासकांसाठी हे संशोधन मार्गदर्शक ठरू शकते.

**निष्कर्ष :**

सम्राट अशोकांचे कैद्यांच्या सुधारणा संदर्भातील धोरण हे आपल्याला चांगला माणूस आणि जबाबदार नागरिक कसे बनावे याचे महत्त्वाचे मार्गदर्शन देते. कलिंग युद्धानंतर अशोकांना समजले की हिंसा, सूड आणि कठोर शिक्षा यामुळे समाज सुधारत नाही. त्यामुळे त्यांनी धम्म या विचारावर आधारित राज्यकारभार सुरू केला. धम्म म्हणजे दया, करुणा, सत्य, अहिंसा आणि माणुसकी.

अशोकांचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी गुन्हा करणाऱ्या व्यक्तीलाही माणूस म्हणून वागवले. त्यांच्या मते, शिक्षा देण्याचा उद्देश एखाद्याला त्रास देणे नसून, त्याला सुधारण्याची संधी देणे हा असावा. म्हणूनच त्यांनी कैद्यांना मृत्युदंड देण्यापूर्वी तीन दिवसांची मुदत दिली, जेणेकरून विचार करता येईल आणि चूक सुधारण्याची संधी मिळेल. हे धोरण त्या काळात खूपच प्रगत आणि माणुसकीचे होते. अशोकांनी कैद्यांच्या शारीरिक व मानसिक गरजांकडे लक्ष दिले. त्यांना योग्य अन्न, उपचार आणि सन्मान मिळावा, यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश दिले. धम्ममहामात्रांच्या माध्यमातून कैद्यांना योग्य मार्गदर्शन दिले जात असे. यामुळे कैद्यांमध्ये आत्मचिंतन, चांगले विचार आणि समाजात परत जाण्याची तयारी निर्माण होत होती.

आज आपण मानवाधिकार, तुरुंग सुधारणा आणि सुधारात्मक न्यायव्यवस्था या संकल्पना शिकतो. या सर्व विचारांचे मूळ सम्राट अशोकांच्या धोरणात आढळते. त्यामुळे अशोक हे केवळ इतिहासातील राजा नसून, आजच्या काळासाठीही आदर्श मार्गदर्शक आहेत. सम्राट अशोकांकडून हे शिकले पाहिजे की हिंसेपेक्षा शांती श्रेष्ठ आहे, सूडाऐवजी सुधारणा महत्त्वाची आहे, प्रत्येक माणसाला बदलण्याची संधी दिली पाहिजे.

सम्राट अशोकांचे जीवन आणि धोरण आपल्याला सांगते की चांगला माणूस होणे हेच खरे यश आहे. जर आपण त्यांच्या विचारांप्रमाणे वागलो, तर आपला समाज अधिक न्याय्य, शांत आणि मानवतावादी बनेल.

**संदर्भसूची :**

https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P034
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

१. थापर,रो . (१९९८). *अशोक अँड द डिक्लाइन ऑफ मौर्याज* (पृ. १०२—१३५). ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीप्रेस.
२. मजुमदार, आर. सी. (१९७३). *अॅडव्हान्स्ड हिस्ट्री ऑफ इंडिया* (पृ. २१०—२४५). मॅकमिलन.
३. झा, डी. एन. (२००४). *एन्शन्ट इंडिया: एन इंटरप्रिटेशन* (पृ. १८०—२१५). मनोहर पब्लिकेशन्स.
४. नीलकंठ शास्त्री, के. ए. (१९७५). *ए हिस्ट्री ऑफ साऊथ इंडिया* (पृ. ९५—१२०). ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
५. सरकार, य. (१९६२). *अशोक द ग्रेट* (पृ. ५०—९८). तिबहार राष्ट्रभाषा परिषद.
६. अल्तेकर, ए. एस. (१९४९). *स्टेट अँड गव्हर्नमेंट इन एन्शन्ट इंडिया* (पृ. १३०—१७५). मोतीलाल बनारसीदास.
७. कुल्के, ह., & रॉथरमुंड, ड. (२००४). *ए हिस्ट्री ऑफ इंडिया* (पृ. ७५—११०). रूटलेज.
८. घोषाल, यू. एन. (१९५७). *स्टडीज इन इंडियन हिस्ट्री अँड कल्चर* (पृ. २२०—२६५). ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
९ प्रकाश, ब. (१९६२). *अशोकाचा धम्म* (पृ. ४५—८५). स्टर्लिंग पब्लिशर्स.
१० . लाल, वि . (2006). *हिस्ट्री ऑफ इंडिया* (पृ. 155—195). पेंग्विन बुक्स.
११. चोपडा, पी. एन. (1985). *भारत का प्राचीन इतिहास* (पृ. 170—210). नॅशनल बुक ट्रस्ट.
१२ गुप्त, परमेश्वरीलाल, प्राचीन भारत के प्रमुख अभिलेख,*प्रकाशक:* विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी, *पृष्ठ संख्या:* 39-42 ।